# जांभेकर प्रतिष्ठान

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चा अधिनियम २१

नोंदणी क्रमांक : महा/९२२/०३ ठाणे दिनांक १०-१०-२००३

कार्यालय : ए५/१६ रुनवाल नगर कोलबाड रोड, ठाणे (प)४०० ६०१ ✆ : २५४७८४७३


संदर्भ क्र. :

दिनांक : १/७/१३

सुमती जांभेकर
मार्कंडी,
चिपळूण, जि. रत्नागिरी

जांभेकर बंधु - भगिनी व जांभेकर कुटुंबीय

सादर प्रणाम.

१९मे २०१३ रोजी जांभेकर प्रतिष्ठानची सर्वसाधारण सभा झाली. त्या सभेत प्रतिष्ठानची नवीन कार्यकारिणी निवडली गेली. या सभेने कुटुंबातील महिलेवर विश्वास टाकून अध्यक्ष पदावर मला निवडून दिले इतकेच नव्हे तर सचिव पदी रश्मी जांभेकर (पुणे) खजिनदार पदी मंगेश (मुंबई) सभासद म्हणून रघुवीर व वैदेही (मुंबई) यांची निवड झाली. जांभेकर कुटुंबियानी कार्यकारिणीत महिलांना बहुसंख्येने स्थान दिले आणि आपल्या पुरोगामी विचारांचे दर्शन घडविले याचा मनःपूर्वक आनंद झाला. जांभेकर कुटुंबियांशी प्रतिष्ठानची अध्यक्ष या नात्याने मी पत्रकाने संवाद साधू इच्छिते.

दिगंबर पंत, निळकंठ भाऊ, शरद दादा, राजाराम पंत विष्णु पंत यांचे बरोबरच मधुकर, सुधाकर, विवेक या सर्व जांभेकरांनी जांभेकर कुटुंबियाना एकत्र आणण्यासाठी जांभेकर प्रतिष्ठानची स्थापना केली. मनोहर जांभेकर यांनी हा विचार

आणाखिन पुढे नेऊन या सर्वांच्या सतकार्याने कुलवृत्तांत छपाईची जबाबदारी उचलली आणि जांभेकर कुटुंबियांची संमेलने घेऊन इतर जांभेकरानाही अशी संमेलने घेण्यास प्रोत्साहित केले व जांभेकर कुटुंबियांच्या स्नेहवर्धनाचा विचार पुढे नेण्याचा प्रयत्न केला. त्यात श्री उदय, मंगेश यांच्या सारखे तरुण रक्त त्यांच्या सतकार्यात आले. जयंत जांभेकर, सुरेश जांभेकर यांनीही कुटुंबाच्या रथ पुढे नेण्यात योगदान दिले. आणि आता हा कुटुंबियांचा स्नेहवर्धनाचा प्रवाह आम्हा ५ जणांवर पुढे नेण्यासाठी / प्रवाही करण्याची जबाबदारी सोपविली आहे.

गेली १५ वर्षे जांभेकर प्रतिष्ठानच्या मिटिंग- स्नेह संमेलने यांना उपस्थित राहिल्यामुळे अनेक जांभेकर कुटुंबियांशी ओळख झाली. सुरुवातीला मुंबई - पुणे येथे सभा - संमेलनाला बऱ्या पैकी उपस्थिती होती पण हळूहळू ही उपस्थिती कमी होऊ लागली. पोंभुर्ल्यातील बाळ- शास्त्री जांभेकरांच्या जयंती - पुण्यतिथीच्या कार्यक्रमाची उपस्थिती कमी होऊन या वर्षी ती नगण्य होती. यापुढे प्रतिष्ठानचे काम चालू ठेवणे अगर वाढविणे साठी देश- परदेशातील जांभेकरां बरोबर संवाद साधण्याची नितांत गरज वाटते. परंतु हे काम सुरु करण्यापूर्वी प्रतिष्ठानच्या विषयी काही मुलभूत गोष्टींची चर्चा होऊन त्यातून 'आपुला संवाद आपणाशी" करीत करीतच कामे पुढे जातील असा विश्वास वाटतो.

मुळातच कौटुंबिक संमेलनांची गरज आहे की ती कालबाह्य आहेत? असा विचार पुढे येऊन दोन्ही

लोकांनी सुरू केलेला उपक्रम त्यानीच पुढे न्याना अशी विचार धारा जोर पकडू लागते. ही विचार धारा प्रभावी बनली तर पुढ्याही लोकही थंड पडतात आणि सगळे काम थंड पडते. जांभेकर प्रतिष्ठानची कल्पना जरी इतर कुटुंब संमेलनांच्या मानाने मुद्दाम सुरू झाली असली तरी ती एका पातळीवर वेगळी बोळ पहात आहे. म्हणून आपल्या कुटुंब संमेलनाची व कार्याची चर्चा आवश्यक ठरते.

कुटुंबाच्या संमेलनात कुटुंबाच्या ४००/५०० वर्षांच्या ज्ञात इतिहासाची आठवण काढत एक मूळ कुटुंब - पुरुष निश्चित करत पुढे त्याच्या वटवृक्षाची वंशावळ देऊन आपण सगळे एका वृक्षाचे आहोत ही भावना निर्माण होते आणि ती सर्वांना नक्कीच सुखावह वाटते. आजच्या वेगवान धकाधकीच्या जगात आपल्या जवळच्या नातेवाईकांशी स्नेहाचे संबंध ठेवत आपले गाव, तेथील प्रथा, देवळे शाळा यांच्या प्रेमात माणूस हमखास पडतो. आणि विश्वाच्या या पसाऱ्यात माझेही गणगोत आहेत हा दिलासा मिळतो. अर्थात गाव पातळीवर ज्यांचे हितसंबंध एकमेकांशी खूपच घट्ट जखडले गेले आहेत त्यांना भाऊबंदांचा उपयोग होण्यापेक्षा उपद्रव होण्याची शक्यता वाढते त्यामुळे त्यांचे कुटुंब संमेलनाविषयी मत कुंपणावरचे असणे शक्य आहे. पण इतर निरनिराळ्या ठिकाणी विखुरलेले कुटुंबीय आपल्या गणगोतामधे खूप रमून जातात. याचा अनुभव गुजराथ मधील माजी माधवराव आता अमेरिकेत स्थायिक आहेत त्यांचे बरोबर बोलताना किंवा अमेरिका स्थित प्रसिद्ध मार्केटर श्री. सुधीरजी यांचे बरोबर बोलताना आला. या दोघांसाठी जांभेकर प्रतिष्ठानची कल्पना पुढे न्यावी असेच वाटते.

अर्थातच ही कल्पना पुढे न्यायची असल्यास महाराष्ट्र व बिहार राज्यात स्थायिक झाले त्या जांभेकरांपर्यंत ही कल्पना पोचावी यासाठी त्यांचे जवळ सगळ्यांचे संपर्क व्हावा जेणे करून या कल्पनेला साकार करण्यासाठी त्यांचा सहभाग मिळेल. त्या दृष्टीने ही कार्यकारिणी प्रयत्न करेल पण आपलाही सहभाग आवश्यक आहे. जास्तीजास्त जांभेकर एकत्र आल्यावर प्रतिष्ठान सभासदां बरोबर जांभेकरांना भूषणावह वाटेल असे उपक्रमही हाती घेऊ शकेल. आपल्याला कै. बाळशास्त्री च्या रूपाने एक दैदिप्यमान वारसा मिळाला आहे. त्यांचे नाव घेऊन अनेकजण पत्रकारितेत मोठे झाले होत आहेत. त्यांच्या बुद्धि वैभवाला साजेल असे उपक्रम जांभेकर कुटुंबियांनी हाती घेतल्यास जांभेकर कुटुंबियांचा आणखीन भव्य वारसा तयार करता येईल.

या दृष्टीने कार्यक्रम आखता येतील. पैसा उभा करण्यासाठी परिश्रम घेता येतील. परंतु बाळशास्त्रींवर प्रेम करणारे तसेच आपण जांभेकर कुटुंबीय मिळून एक मोठा प्रवाह तयार करूया. आपले मत जाणून घेण्यासाठी या पत्रा सोबत एक प्रश्नावली पाठवित आहोत. ती कृपया भरून पाठवावी. तसेच सर्वसाधारण सभावृत्तांतही आपल्या माहिती साठी पाठवीत आहे. आपली मते प्रश्नावलीतून कळविल्यास सभासदांची अद्यावत माहितीही प्रतिष्ठानकडे संकलित होईल.

भेटूया पत्राने.

धन्यवाद [illegible]

सुमती जांभेकर

॥ श्री महालसा नारायणी प्रसन्न ॥ ॥ श्री जांभई प्रसन्न ॥

# जांभेकर प्रतिष्ठान

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चा अधिनियम २१
नोंदणी क्रमांक : महा/९२२/०३ ठाणे दिनांक १०-१०-२००३
कार्यालय : ए५/१६ रुनवाल नगर कोलबाड रोड, ठाणे (प)४०० ६०१ ✆ : २५४७८४७३

संदर्भ क्र. : दिनांक :

जांभेकर प्रतिष्ठानच्या कार्यासंदर्भात आपले मत जाणून घेण्यासाठी ही प्रश्नावली.
कृपया भरून पाठवावी.

E-Mail - mangesh.jambhekar @ email.com
पोस्टल ॲड्रेस - मंगेश जांभेकर, Flat No. 103 - B2 जंबोदर्शन कोलडोंगरी नं. 2 अंधेरी पूर्व मुंबई ४०००६९.

१) सभासदांची (प्रतिष्ठानच्या) माहिती.
   १) नांव -
   २) पत्ता / व फोन नं.
   ३) कुटुंबातील सभासद संख्या.
   ४) परदेशात नाते वाईक असल्यास त्यांचे
      नांव.
      पत्ता / फोन नं.

२) आपल्या कुटुंबा विषयी -
   १) कुटुंबातील सर्व सदस्य वर्षातून एकत्र येतात का? - होय / नाही
   २) कौटुंबिक कार्यक्रम किंवा स्नेहसंमेलनासाठी वर्षातून किती वेळ एकत्र येतात?
   ३) जांभेकर कुटुंबियांच्या प्रतिष्ठानची - संमेलनाची गरज वाटते का? - होय / नाही.

३) बाळशास्त्री जांभेकरां विषयी - पूर्ण माहिती आहे का? - होय / नाही.

२) त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ जांभेकर प्रतिष्ठानने
कार्य उभे करावे असे वाटते काय. होय / नाही.

३) कोणते कार्य उभे करावे? — शैक्षणिक / सामाजिक / इतर.

४) कोठे करावे - कोकणात / महाराष्ट्रात कोठेही

५) आपला सहभाग देऊ इच्छिता काय. - होय / नाही

जांभेकर प्रतिष्ठानचे कार्य करण्यासाठी या प्रश्नावलीची
गरज आहे. कृपया ती भरून पाठवावी ही नम्र विनंती.

कार्यकारिणी
जांभेकर प्रतिष्ठान.

# MEETING MINUTE BOOK

## सभेचे मिनिट बुक

Meeting No./सभा नं. ७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा Date/तारीख रविवार १९|५|२०१३

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|
| | जांभेकर प्रतिष्ठानची ७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १९|५|२०१३ रोजी चिपळूण येथे भरली होती. व खालील सभासद, हितचिंतक हजर होते. मिटींग ११॥ वाजता चालू | |
| | १) म. नोहर जांभेकर अध्यक्ष | मनोहर जांभेकर |
| | २) श्री मंगेश जांभेकर संयुक्त सचिव खजिनदार | [signature] |
| | ३) श्रीमती सुमती जांभेकर सदस्या | [signature] |
| | ४) रघुवीर जांभेकर सभासद (डोंबिवली) | R. Jambhekar |
| | ५) सौ वैदेही जांभेकर सभासद डोंबिवली | V Jambhekar |
| | ६) श्री गिरीधर जांभेकर सभासद | G Jambhekar |
| | ७) श्री दिगंबरपंत जांभेकर —"— | |
| | ८) श्री रा.रा. जांभेकर —"— | |
| | ९) श्री सुधाकर जांभेकर —"— | [signature] |
| | १०) सौ रश्मी जांभेकर | R Jambhekar |
| | ११) श्री अरुण बाळकृष्ण जांभेकर | Jambhekar |
| विषय १ | अध्यक्षांनी सर्व सभासदांचे स्वागत करून ~~सभेला सुरुवात केली~~. गणसंख्ये अभावी १/२ तासानंतर | |
| | मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे. | |
| ठराव नं. १ | दि. २९|७|१२ रोजी झालेल्या सभेचा वृत्तांत कायम करण्यात येत आहे. | |
| | सूचक - वैदेही | |
| | अनु. रश्मी. | |
| विषय २ | ७ व्या वार्षिक अहवालाचे वाचन करून मंजुर करणे. | |

# ANNUAL / SPECIAL GENERAL

## वार्षिक / विशेष सर्वसाधारण

Meeting No. / सभा नं. ७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा Date / तारीख रविवार १९/मे/२०१३

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|
| 2 | अहवाल वर्षातील कार्याचा आढावा सभेपुढे मांडला गेला. बाळशास्त्री जांभेकरांची २०० वी जन्मशताब्दी चिपळूण मध्ये चांगल्या प्रकारे उत्साहात साजरी करण्यात आली. व १६६ वी पुण्यतिथी पोंभुर्ले येथे साजरी करून जांभेकर कुटुंबियांनी बाळशास्त्रींना चांगली मानवंदना दिल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. परंतु जांभेकर कुटुंबियांचे संबंध अधिक दृढ होण्याचे दृष्टीने वेगवेगळे उपक्रम राबवावेत असा विचार मांडून अहवाल मंजुर करण्यात येत आहे. | |
| | सूचक - मंगेश | |
| | अनुमोदक - अरुण. | |
| | ठराव एकमताने मंजुर झाला. | |
| 3 | विषय - २०११-१२ चा ऑडिटेड जमा खर्च मंजुर करणे. | |
| ठराव. | ऑडिटर मणिलाल सर यांनी प्रतिष्ठानच्या जमाखर्च तपासून ऑडिट रिपोर्ट दिला आहे. सदर रिपोर्टची सभा मंजुर करीत आहे | |
| | सूचक - सुमती जांभेकर | |
| | अनु - दिगंबरपंत. | |
| | ठराव एकमताने मंजुर झाला. | |
| ४ | विषय २०१२-१३ या वर्षाचे हिशेब ऑडिट करणे. | |
| | विषयानुषंगाने १२-१३ सालच्या हिशेब तपासून घेण्याचे काम मंगेश जांभेकर यांनी करणे | |
| | सूचक - विद्याधर | |
| | अनु. - रश्मी | |
| | ठराव एकमताने मंजुर झाला. | |

## MEETING MINUTE BOOK

## सभेचे मिनिट बुक

Meeting No. / सभा नं. Date / तारीख

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
| --- | --- | --- |
| | ५ ~~विषय~~ २०१३-१४ साल करिता ऑडिटर नेमणे. | |
| | २०१३-१४ सालासाठी ऑडिटर नेमणे साठी चॅरिटी कमिशनर ऑफिस ठाणे येथे चौकशी करून प्रतिष्ठानचे ऑफिस बदलल्यास काय फरक पडेल याची माहिती घेऊन नंतर ऑडिटर नेमण्याचा निर्णय घेण्यात यावा. यासाठी ऑडिटर नेमण्याचा अधिकार श्री. मंगेश जांभेकर याना देण्यात यावा. | |
| | ठराव एकमताने मंजूर झाला. सूचक - सुधाकर<br>अनुमोदक - रश्मी | |
| | वरील कामकाजा नंतर आधीची कार्यकारिणी बरखास्त करून पुढील कामकाजासाठी श्री. मनोहर जांभेकर यांच्या अध्यक्षते खाली कामकाज सुरू झाले. | |
| | ६ ~~विषय~~ - नवीन कार्यकारिणी निवडणे - २०१३ ते २०१६ साल साठी. | |
| | २०१३-२०१६ या कालावधी साठी खालील कार्यकारिणी ठरविण्यात येत आहे | |
| | अध्यक्ष - सुहास जांभेकर चिपळूण (चंद्रेश) | |
| | सचिव - रश्मी जांभेकर (अजय) पुणे | |
| | खजिनदार - मंगेश जांभेकर (दिवाकर) मुंबई | |
| | सभासद रघुवीर विद्याधर जांभेकर डोंबिवली | |
| | -॥- वैदेही रघुवीर जांभेकर -॥- | |
| | सूचक अरुण जांभेकर<br>अनु. सुधाकर जांभेकर | |
| | ठराव एकमताने मंजूर झाला. | |

## ANNUAL / SPECIAL GENERAL

## वार्षिक / विशेष सर्वसाधारण

Meeting No. / सभा नं. ७वी वार्षिक सर्वसाधारण सभा Date / तारीख २५/५/२०१३

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|

(७) विषय संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता बदलणे.

या आधी संस्थेचे कार्यालय श्री. मधुकर जांभेकर यांचे घरी असे. परंतु त्यांनी काही खाजगी कारणामुळे संस्थेचे कार्यालय दुसरीकडे हलविण्यास सांगितले आहे. तसे लेखी पत्रही त्यांनी दिले आहे. या स्तव ही सभा संस्थेचे कार्यालय - सुमती जांभेकर चिपळूण माळी यांचे घरी करण्याचा निर्णय घेत आहे. त्याप्रमाणे आवश्यक त्या सर्व ठिकाणी नवीन पत्ता कळविण्याचे नवीन कार्यकारिणीने करावे. त्यासाठी योग्य ते कागदपत्र चॅरिटी कमिशनरकडे सादर करावेत.

सूचक - मंगेश जांभेकर
अनु - अरुण जांभेकर

ठराव एकमताने मंजुर झाला.

विषय ८ घटनेत बदल करणे. - व संस्थेच्या नावात बदल करणे.

सध्याची संस्थेची घटना जांभेकर कुटुंबियां पुरती मर्यादित आहे. जांभेकर प्रतिष्ठान या संस्थेचे कार्य व्यापक होण्याचे दृष्टीने 'जांभेकर प्रतिष्ठान' ऐवजी "आचार्य बाळशास्त्री जांभेकर प्रतिष्ठान" असे संस्थेचे नाव बदलण्यात यावे असा निर्णय ही सभा घेत आहे. व या अनुषंगाने घटनेत जे बदल करावयाचे हवेत ते बदल करण्या साठी विशेष सर्व साधारण सभा लावून बदल सर्व सदस्यांच्या संमतीने मंजुर करून घ्यावेत. त्यानंतर परदेशातून मदत मिळविणे, अगर शासनस्तरावरून मदत मिळविणे व समाजातून मदत मिळवून कार्य व्यापक करता येईल.

सूचक - सुमती जांभेकर
अनु. - मंगेश

ठराव एकमताने मंजुर. भोजनानंतर सभा समाप्त झाली.